# पौल तीमथ्य अभ्यासाचा उपयोग कसा करावा सुरुवात करा

**1. तुमच्या गरजांनुरूप अभ्यासक्रम कसे निवडायचे, त्याकरिता पौल तीमथ्य उपयोग करणाूयांचा कार्यक्रम कसा उपयोगात आणावा:**

- तुमच्या समन्वयकाकडून पौल तीमथ्य उपयोग करणाूयांचा कार्यक्रम ह्याची प्रत मागून घ्या किंवा www.Paul-Timothy.net ह्या वेबसाईटवरून ती उतरवून घ्या.
- अभ्यासक्रमाची 16 सेवाकार्यामध्ये विभागणी केली आहे. (यात परिचयात्मक अभ्यासाचा समावेश आहे) प्रत्येक विद्यार्थ्यासाठी त्याच्या मंडळीच्या सध्याच्या गरजांनुरूप अभ्यासक्रम निवडा.
- प्रथम गरजेनुरूप अभ्यासक्रम असलेल्या सेवाकार्याचा शोध करा. उदाहरणार्थ, समजा एखाद्या विद्यार्थ्याला उपासनेमध्ये काही भर घालायची असेल तर त्याने योग्य असा अभ्यासक्रम उपासना ह्या शिर्षकाखाली पाहावा.
- प्रत्येक सेवाकार्याच्या क्षेत्रासाठीचे अभ्यासक्रम निरनिराळे ठेवा म्हणजे तुम्हांला ते सहजपणे सापडतील.

**2. उपयोग करणाूयांचा कार्यक्रम यातील सेवाकार्यामध्ये विविध विषयांवरील अभ्यासक्रमांचे गट केले आहेत.**

- सेवाकार्याच्या प्रत्येक क्षेत्रासाठी अभ्यासक्रमांचे अनेक गट आहेत. उदाहरणार्थ, “उपासना” ह्या सेवाकार्यात प्रभुभोजन, येशूचे पुनरूत्थान साजरे करणे आणि उपासनेचे अन्य पैलू यावरील अभ्यास आहेत.
- प्रत्येक गटामध्ये मेंढपाळांसाठी आणि मुलांसाठीचा अभ्यास आहे. दोन्ही अभ्यासक्रमांचा विषय एकच आहे. यामुळे मोठ्या माणसांसमोर सादर करावयाच्या पवित्र शास्त्रातील कथावृत्तांताची तयारी करण्यास मुलांना वेळ मिळतो. पवित्र शास्त्रातील कथावृत्तांताचे नाट्यीकरण मुलांना उपासनेच्या दरम्यान मोठ्या) माणसांसमोर सादर करता येईल.
- मेंढपाळांसाठीच्या अभ्यासात ‘मेंढपाळ’ असा शब्द वर नमूद केलेला आहे. त्यांच्या अभ्यासक्रमाच्या क्रमांकाच्या अखेरीस ‘a’ हे अक्षर आहे, उदाहरणार्थ ‘A1a’.
- मुलांसाठीच्या अभ्यासात ‘मुलांसाठी’ असा शब्द वर नमूद केलेला आहे. त्यांच्या अभ्यासक्रमाचा क्रमांक ‘b’ ह्या अक्षराने संपतो, उदाहरणार्थ ‘A1b’
- काही गटांमध्ये विषयावरील अतिरिक्त माहितीसह पुरवणी अभ्यासक्रमही आहेत. अशा अभ्यासक्रमांचा क्रमांक c,d किंवा e ह्या अक्षरांनी संपतो,
- नवीन मेंढपाळांच्या अभ्यास क्रमामुळे एखाद्याला आगामी आठवड्यातील कार्यक्रम आणि पुढील उपासना सभा अशा दोन्ही गोष्टींचे नियोजन करण्यास मदत होते.

**3. “सुरुवात करा” अभ्यासक्रमाचा उपयोग करून पौल तीमथ्य पुढारी प्रशिक्षणाचा आरंभ करा:**

- प्रशिक्षक नवीन मेंढपाळांना प्रशिक्षण देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे ह्या अभ्यासाचा उपायोग करतात www.Paul-Timothy.net अभ्यासक्रम क्रमांक A0f
- पाळकीय अभ्यास करणारे विद्यार्थी प्रशिक्षण घेणाूया नवीन मेंढपाळांसाठी मार्गदर्शकतत्वे ह्या अभ्यासाचा उपायोग करतात, क्रमांक A0a
- नवीन मेंढपाळांविषयीच्या सर्व अभ्यासक्रमांचा अखेरीस ‘a’ हे अक्षर आहे.
- मुलांना शिकविणारे शिक्षक, मुलांच्या शिक्षकांसाठी मार्गदर्शकतत्वे ह्या अभ्यासाचा उपयोग करतात क्रमांक A0b
- मुलांसाठीच्या सर्व अभ्यासक्रमांच्या क्रमांकांच्या अखेरीस ‘b’ हे अक्षर आहे.

- उपासनेचे पुढारी, गट उपासनेचे पुढारीपण करणूायांसाठी मार्गदर्शकतत्वे ह्या अभ्यासाचा उपयोग करतात, क्रमांक A0e
- इतर सेवक, सेवक, सेविका, लहान गटाचे पुढारी आणि आठड्यामध्ये कार्यक्रमांचे पुढारीपण करणारे इतर यांच्यासाठीच्या मार्गदर्शकतत्वांचा उपयोग करता, क्रमांक A0d.
- समन्वयक हे पौल तीमथ्य प्रशिक्षणाच्या कार्यशाळेचे पुढारीपण करताना पौल तीमथ्य कार्यशाळा पुस्तिका उपयोगात आणतात. हे तुम्हांला www. Paul-Timothy.net ह्या वेबसाईटवरून मोफत घेता येईल, डाव्या बाजूला 'workshop manual' वर क्लिक करा.

**4. पौल तीमथ्य अभ्यासक्रम तुम्हांला सामुहिक एकत्र उपासनेच्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यास साहाय्य करतात.**

उपासनेच्या तयारीसाठी पौल तीमथ्य अभ्यासाचा उपयोग करा. या उपासनेत अनेकजण कौटुंबिक वातावरणात सहभागी होतील. यात मुलांचाही समावेश आहे. लोकांचे नातेसंबंध जवळकीचे असतात अशा सभांमध्ये पवित्र आत्मा अधिक सामर्थ्याने कार्य करतो.

**5. पौल तीमथ्य अभ्यास योग्य आकारात पॉकेट साईझ छापता येईल.**

वापरण्यास व हाताळण्यास सुलभ अशा पद्धतीचे अभ्यासक्रम उपलब्ध करून द्या. नवीन मेंढपाळ व मुले ह्यांचा अभ्यास एका कागदावर बसला पाहिजे, दोन्ही बाजूस छपाई करा. घडी घातलेल्या फोल्डरची चार पाने अभ्यासाचे लिखाण तुमच्या गरजांवर लक्ष केंद्रित करून केले पाहिजे.

पौल तीमथ्य अभ्यासाच्या लेखकांना तुम्ही इतर गरजांविषयी सांगितले तर ते त्यानुसार अभ्यास तयार करण्याचा प्रयत्न करतील. तुमच्या गरजा तुम्ही तुमच्या पुढ्रायांना सांगा म्हणजे ते तसे लेखकांना कळवतील.

- पौल तीमथ्य
- पौल तीमथ्य अभ्यासाच्या अभ्यासक्रमाला अंतिम स्वरूप कधीच येणार नाही कारण तुमच्या मंडळ्यांच्या गरजांविषयी तुम्ही दिलेल्या अहवालावरून अभ्यासक्रमांमध्ये भर घातली जाईल किंवा सुधारणा करण्यात येईल.
- पौल तीमथ्य वेळोवेळी पुरवणी अभ्यासक्रम प्रकाशित करीत असते. नवीन काय आहे ते जाणून घेण्यासाठी वरचेवर WWW.Paul-Timothy.net ह्या आमच्या वेबसाईटला भेट देत जा.




**6. पौल तीमथ्य अभ्यासक्रमांची नक्कल वा अनुवाद यावर कोणतीही बंधने नाहीत.**

- ही पुस्तिका व साहित्य विनामूल्य कॉपी करून घेता येते, कोणत्याही भाषेत अनुवादित करता येते, कोणत्याही माध्यमातून जतन करून ठेवता येते आणि विनामूल्य किंवा किंमत घेऊन वितरीत करता येते. फक्त त्यामध्ये कृपा करून पुढील विधान असावे:

Copyright © 2004 by Paul-Timothy

- हे साहित्य कोणत्याही भाषेत किंवा विभागात निर्माण करण्याचा, साठा करण्याचा, विक्री करण्याचा वा वितरण करण्याचा अधिकार कोणा एकालाच दिलेला नाही.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net